अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि.२० जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : १०२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## रोहित पवारांना ईडीची नोटीस, चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश

**मुंबई** : राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांना ईडीची नोटीस बजावण्यात आलीये. दरम्यान रोहित पवार यांना २४ जानेवारी रोजी चौकशीसाठी बोलावण्यात आलं आहे.

आआधी देखील केंद्रीय यंत्रणांकडून रोहित पवारांना वेगवेगळ्या प्रकरणात नोटीस बजावण्यात आली होती. तसेच नुकतचं त्यांच्या बारामती अ‍ॅग्रोशी संबंधित कारखान्यांवर ईडीचे छापे पडले होते. त्यानंतर आता रोहित पवार यांनी ईडीची नोटीस बजावण्यात आलीये. दरम्यान मागील अनेक दिवसांपासून रोहित पवारांच्या घरी ईडीची छापेमारी सुरु होती. पण त्यांना चौकशीसाठी बोलावण्यात आले नव्हते. तसेच मी ज्याप्रकारे वेगवेगळ्या मुद्द्यांवर भाष्य करतोय, त्यामुळे माझ्यावर केंद्रीय यंत्रणांचा दबाब आणण्याचा प्रयत्न सुरु असल्याचं रोहित पवारांकडून वारंवार सांगण्यात येत होतं. त्यामुळे आता या सगळ्या घडामोडींवर रोहित पवार काय भूमिका घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. तसेच यानंतर रोहित पवार चौकशीला हजर राहणार हे पाहणं देखील गरजेचं ठरेल. बारमती अ‍ॅग्रो कथित गैरव्यावहार प्रकरणी मुंबईसह सहा ठिकाणी ईडीने छापेमारी कोली होती. आमदार रोहित पवार यांची ही बारमती अ‍ॅग्रो कंपनी आहे. बारामती अ‍ॅग्रोच्या सहा कार्यालयावर ईडीकडून तपास करण्यात आला होता.



# श्रमिकांशी जिव्हाळा, सोलापूरशी लळा प्रधानसेवकाचा दाटून आला गळा

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**पंतप्रधान नरेंद मोदी आणि सोलापूर यांच्या ऋणानुबंध सर्वश्रुत आहे.येणाऱ्या प्रत्येक लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोदींचा सोलापूरला पदस्पर्श लाभला आहे. जाहीर सभांमधून अस्स्खलित हिंदीतून भाषण आणि अधूनमधून मराठीचे डायलॉग मारत मोदींनी सोलापूरला आपलेसे करून करून घेतले आहे.त्याचा प्रत्यय शुक्रवारी सोलापूरकरांना पुन्हा आला. कुंभारी येथील सभेत श्रमिकांना पाहिल्यानंतर मोदींनी त्यांच्याविषयी जिव्हाळा व्यक्त केला तर सोलापूरविषयी असलेला लळाही सांगितला. अहमदनगर आणि सोलापूर यांच्यातील नात्याचा उल्लेख करताना या प्रधानसेवकाचा कंठ जेव्हा दाटून आला, तेव्हा सभा एकदम स्तब्ध झाली.**

सोलापूर-अक्कलकोट रस्त्यावरील कुंभारी गावानजिम श्रमिक आणि कष्टकरी यांच्यासाठी देशातील पहिली घरकूल योजना साकारण्यात आली.त्यातील काही घरांचे हस्तांतरण मोदी यांच्या हस्ते झाले.३० हजारपैकी १५ हजार घरांचा ताबा श्रमिकांना देण्यात आला. त्यानंतर त्यांनी सभेला संबोधित केले.सभेला अलोट गर्दी झाली होती. मोदी ज्या राज्यात जातात,तिथल्या स्थानिक भाषेतूनच भाषणाची सुरूवात करतात. त्यांनी पंढरीच्या श्रीविठ्ठलाला आणि सोलापूरच्या श्रीसिध्देश्वरांना नमन करत भाषणाचा आरंभ केला. केली. आज एक लाखापेक्षा जास्त लोकांना घर मिळत आहे त्यामुळे आनंद होतो आहे.समोर बसलेल्या श्रमिकांना पाहिल्यानंतर लहानपणी अशा घरात राहायला मिळाले असते तर किती छान झाले असते, असे म्हणताना मोदींचा कंठ दाटून आला.हजारो कुटुंबांची स्वप्न जेव्हा साकार होतात तेव्हा त्यांचे आशीर्वाद माझी सर्वात मोठी पुंजी असतात असं म्हणताना मोदींना अश्रू अनावर झाले. ते अत्यंत भावूक झाले. मी जेव्हा रे- नगर या प्रकल्पाचे भूमिपूजन केले होते तेव्हाच तुम्हाला गॅरंटी दिली होती की तुमच्या घरांच्या चाव्या देण्यासाठीही मी स्वतः येईन. आज मी माझं वचन पूर्ण केलं आहे आणि याचा मला खूप आनंद आहे. मोदींची गॅरंटी म्हणजे वचनपूर्ती असंही मोदी म्हणाले. इतके दिवस गरिबी हटावचा नारा दिला जात होता. पण गरिबी हटली नव्हती. मी अहमदाबादमध्ये राहिलो आहेत. ती देखील कामागारांची भूमी आहे. पद्मशाळी कुटुंबांनी मला कधींही उपाशी ठेवलं नाही. सोलापूरमधल्या एका गृहस्थांनी मला विणलेलं एक चित्र पाठवलं होतं ती आठवणही आज मोदींनी आपल्या भाषणात सांगितली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यात मोठे सहकार्य होते. त्यांनी म्हाडाकडून २७० कोटी रुपये बिनव्याजी रे नगरला दिले. मी आज ठामपणे सांगतो की ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत इथले ३० हजार घरे बनून तयार होतील. हे भारतातले पहिले श्रमिक शहर तयार होत आहे, असंही ते म्हणाले. यावेळी आडम यांनी त्यांना सामना कराव्या लागणाऱ्या अनेक समस्याही मोदींसमोर मांडल्या. यावर लवकर निर्णय घ्यावा, अशी विनंती त्यांनी केली.

### गंगा घेऊन आले

मोदींच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमीपूजन झालं होते या प्रकल्पातील लाभार्थ्यांना चावी देण्यासाठी स्वत: ते इथे आले. इतकेच नाही, पंतप्रधानांनी करामत करून दाखवली आहे. आम्हाला एक थेंबही पाणी मिळणार नव्हते. मी पंतप्रधान कार्यालयाकडे गेलो. पंतप्रधानांनी आम्हाला वचन दिले की एका महिन्याच्या आत एनटीपीसीचे पाणी तुम्हाला मिळेल. आज मोठ्या अभिमानाने मी सांगतो की ते पाणी नाही, गंगा घेऊन आले. २४ तास पाणी आम्हाला देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. इतकेच नाही, आता त्यावर एक पैसाही खर्च लागणार नाही. हे अजरामर काम पंतप्रधानांनी केले.हा उल्लेख आडम यांनी करताच सभेत टाळ्यांचा कडकडाट झाला.



### हास्याची लकेर!

श्रमिकांचे आशास्थान आणि या प्रकल्पाचे संस्थापक नरसय्या आडम यांनी भाषणाची सुरुवात करताच समोरील सोलापूरकरांप्रमाणेच व्यासपीठावरील मान्यवरांमध्येही हास्याची लकेर उमटली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारत सरकार, राज्याचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री नामदार उद्धव ठाकरे असा उल्लेख त्यांनी करताच उपस्थितांमध्ये हास्याची लकेर उमटली. मात्र, झालेली चूक लागलीच लक्षात आल्यानंतर आडम यांनी यावर दिलगिरी व्यक्त करतानाच चूक दुरुस्तही केली. माफ करा.. देवेंद्र फडणवीस व उद्धव ठाकरे नेहमी येतात त्यामुळे तेच नाव माझ्या तोंडात बसलेय,असे आडम म्हणाले.

### हातमागाची प्रशंसा

सोलापुरातल्या हातमागाच्या कलाकुसरीचे मोदी यांनी कौतुक केले. मला एके दिवशी सोलापूरच्या एका व्यक्तीने हाताने विणून तयार केलेला साताऱ्याचे लक्ष्मणराव इनामदार यांचा फोटो मला भेट म्हणून पाठवून दिला होता. त्यामुळे आजही सोलापूर माझ्यात, हृदयात सामावले असल्याची मधाळ भावना त्यांनी उपस्थितांपुढे व्यक्त केली. तसेच मी जे जॅकेट वापरतो, त्यातील काही जॅकेट हे सोलापुरातून येत असल्याचाही उल्लेखही पंतप्रधान मोदी यांनी यावेळी आवर्जून केला.

### सोलापूरशीही ऋणानुबंध... :

मोदी हे देशभरातील दौऱ्यात तेथील संस्कृतीशी आपला ऋणानुबंध असल्याची भावना व्यक्त करतात. त्यांच्या या आठवणींचा एक पैलू सोलापूरकरांनाही शुक्रवारी अनुभवायला मिळाला. अहमदाबाददेखील कामगारांचे शहर म्हणून ओळखले जाते. त्यामुळे अहमदाबाद आणि सोलापूरचे जवळचे नाते आहे. फक्त अहमदाबादच नाही तर माझे आणि सोलापूरचेही आणखी जवळचे नाते आहे. कारण अहमदाबादमध्ये पद्मशाली समाजाची अनेक कुटुंबे वास्तव्याला आहेत. मी लहान असताना महिन्यातून ३ ते ४ वेळा पद्मशाली कुटुबांत जेवण केले असेल. ते चाळीमध्ये राहायचे. मात्र बेताची परिस्थिती असतानाही त्यांनी मला कधी उपाशी झोपू दिले नाही, अशी आठवण सांगत मोदींनी आपली सोलापूरशी असलेली नाळ अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न केला.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीला पळवले

### तरुणाविरुद्ध विनयभंगासह लैंगिक छळाचा गुन्हा



**सोलापूर** : महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलीला पालकाकडून घरी बसवून अभ्यास करावयास लावले असताना तिला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेण्याची धक्कादायक घटना शहरातील एका परिसरात सकाळी पावणेआठच्या सुमारास घडली.

या प्रकरणी मुलीच्या आईने जेलरोड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवल्याने जुबेर अलीशान मकानदार (वय- २३) याच्याविरुद्ध विनयभंगासह बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कलमान्वये गुन्हा नोंदला आहे. फिर्यादीत पिडितेच्या आईने म्हटले आहे की, यातील पिडिता शहरातील एका परिसरात कुटुंबासमवेत राहते. गुरुवारी सकाळी पावणेआठच्या सुमारास ती झाडू मारता मारता घरातून निघून गेली. शोधाशोध करुनही ती सापडली नाही. जाताना तिने आईचा मोबाईल घेऊन गेली होती. त्यावर फोन केला असता तिने महाविद्यालयात असल्याचे सांगून फोन बंद केला. वरील आरोपीसोबत मुलगी गेली असावी म्हणून त्याच्या मोबाईलवर फोन केला असता त्याचा मोबाईल बंद होता.

आपल्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून प्रेमाचे नाटक करुन पळवून नेले असल्याची तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी तपास महिला फौजदार तळे करीत आहेत.

## पोलीस हवालदार अँटी करप्शनच्या जाळ्यात

**सोलापूर** : दाखल गुन्ह्यात जप्त असलेले वाहन सोडण्यासाठी १ लाख ५० हजारांची लाच मागून तडजोडीअंती १ लाख ३० हजार रुपये स्वीकारण्यास संमती दिल्याप्रकरणी पोलीस हवालदार रवींद्र नारायण बाबर याच्याविरुद्ध एसीबी पथकाने कारवाई केलीय. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर कार्यालयाचे पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार यांनी सांगितले.

सोलापूर ग्रामीण पोलीस अंतर्गत वैराग पोलीस ठाण्यात नेमणुकीस असलेले पोलीस हवालदार रवींद्र नारायण बाबर (रा.शिवाजीनगर, बाळे, सोलापूर) यांनी वैराग पोलीस ठाण्यात मध्ये दाखल दारूबंदीच्या गुन्ह्यात कार जप्त केली होती. ते वाहन सोडण्यासाठी पोलीस हवालदार बाबर यांनी दीड लाख रुपयांची लाच मागितली होती. एक लाख तीस हजार रुपये स्वीकारण्यास संमती दिली. याप्रकरणी सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाकडे आलेल्या तक्रारीची पडताळणी पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार यांनी केल्यावर, ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक शितल जानवे खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या पर्यवेक्षणाखाली पार पाडली.

## शासकीय गोदामातून ट्रॅक्टरसह ट्रॉलीची चोरी

**महसूल विभागाच्या ताब्यातील वाहने चोरीला गेल्याचा अजब प्रकार**



सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर येथील शासकिय गोदाम येथून ट्रॅक्टर ट्रॉली चोरीला गेली असल्याने फिर्यादी सचिन वामन कुंभार (वय ४५ धंदा नोकरी राहणार गणपती नगर टाकळी रोड पंढरपूर) यांनी शासकिय धान्य गोदाम पंढरपूर येथून ट्रॅक्टर व ट्रॉली चोरीला गेल्याने अज्ञात चोरट्याची विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

सचिन कुंभार हे गेले दोन वर्षापासून शासकिय धान्य गोदाम पंढरपूर येथे गोडावून व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत .महसूल विभाग पंढरपूर यांनी अनधिकृत वाळू उत्खनन वाहतूक करणारे ट्रॅक्टर व ट्रेलर तसेच वाहने जप्त करून हे शासकिय गोदामाचे आवारात लावलेली आहेत.

१४ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ऑफिस बंद करून घरी जात असताना धान्य गोदाम समोर जप्त करून लावलेली वाहने पाहिली असता ती सदर ठिकाणी होती. परंतु दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ९.४५ वाजण्याच्या सुमारास ते शासकिय धान्य गोदाम येथे आलो असता धान्य गोदामात लावण्यात आलेला बिगर नंबरचा महिंद्रा कंपनीचा ६०५डी आय मॉडेलचा ट्रॅक्टर व ट्रॉली मिळून आली नाही. कोणीतरी सदर ट्रॅक्टर वर ट्रॉली चोरून नेली आहे त्यानंतर त्यांनी सदर प्रकार तहसीलदार सुशील बेल्हेकर यांना फोन करून सांगून ट्रॅक्टर व ट्रॉली चोरून नेले बाबत लेखी पत्रही दिले. याप्रकरणी कुंभार यांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## अर्थकारण सुधारण्यासाठी काळुंगे सरांनी आर्थिक संस्था निर्माण केली : पवार

सुराज्य/मंगळवेढा

सामान्य माणूस ज्यांच्याकडे धनसंचय कमी आहे अशा माणसाला त्यांचे अर्थकारण सुधारण्यासाठी काळुंगे सरांनी आर्थिक संस्था निर्माण केली असे गौरव उद्गार खासदार शरद पवार यांनी केले. ते मंगळवेढा येथे दिनांक १९ जानेवारी रोजी धनश्री परिवार व सीताराम परिवाराचे संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.


यावेळी व्यासपीठावर शोभा काळुंगे, माजी मंत्री विजयसिंह मोहिते पाटील प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, सिध्दाराम म्हेत्रे माजी आमदार विश्वनाथ चाकोते राजन पाटील, दीपकआबा साळुंखे पाटील, धनाजीराव साठे रामहरी रुपनर माजी महापौर महेश कोठे प्रथमेश कोठे वैभव नाईकवाडी सुरेश हसापुरे चेतन नरोटे भगीरथ भालके बाळासाहेब शेळके प्रकाश पाटील शेखर माने गणेश पाटील दिनकर मोरे, राकेश दादा फाटे, धनंजय पाटील बाळासाहेब पाटील रावसाहेब मगर बाबुराव गायकवाड राहुल शहा हे उपस्थित होते. यावेळी अभिजीत पाटील, हर्षवर्धन पाटील, डॉ. आ.ह .साळुंखे, डॉ. जयवंत महाराज बोधले, यांनी ही आपली मनोगते व्यक्त केली.

यावेळी पवार म्हणाले की सोहळा सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या एका प्रामाणिक व्यक्तिचा असून तो खरोखरच आनंदाचा आहे. मंगळवेढ्यातील काही भाग ज्वारीसाठी प्रसिद्ध आहे तर काही भाग हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो अशा दुष्काळी भागाच्या लोकांना सन्मानाने जगण्यासाठी सरांनी आर्थिक संस्था उभ्या केल्या. दुष्काळी भागातील लोक सन्मानाने जगण्यासाठी वाघाच्या तोंडात हात घालण्याचे काम सर्कशीत करत होते ही वस्तुस्थिती आहे.

यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी त्यांच्या निवडणुकीचे जबाबदारी सरांकडे असताना प्रामाणिकपणे कशी हाताळली ते सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की शिक्षणाच्या माध्यमातून नवा आदर्श समाज घडवायची भूमिका सरांनी घेतली आहे आयुष्यभर कष्ट करायचे काम करायचे ७५ वर्षांपूर्वी ज्या तारुण्यात जगलात त्याची आठवण होताना कुटुंबातील सगळयांनाच आनंद होतो. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजलक्ष्मी गायकवाड यांनी केले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



काडी काडीने बनले घर 'रे' !


कल्याण
589-25-339

मुंबई
133-74-167


## अयोध्येच्या मंदिरातील रामलल्लाचे मोहक रुप




- **मैसूरच्या अरुण योगीराज यांनी काळ्या पाषाणातील रामल्लूलाची ही मूर्ती कोरली**
- **रामलल्लाच्या चेहऱ्यावरील शांत भाव आणि हास्य मूर्तीच्या सौदर्यांत आणखीन भर**
- **मूर्ती सात फुटी असून तिचे वजन १५० किलो**
- **प्रमुख आचार्य आणि गुरुंच्या मंत्रघोषात रामलल्लाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाईल**

सुराज्य/अयोध्या

गेल्या तीन दशकांपासून देशातील राजकारण आणि समाजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या अयोध्येतील भव्य राममंदिराचे येत्या २२ जानेवारीला उद्घाटन होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रामलल्लाच्या मूर्तीची मंदिरात प्रतिष्ठापना केली जाईल.

हा सोहळा आता अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे सध्या देशभरात सर्वत्र 'रामनामा'चा जप सुरु असून सर्वांना अयोध्येतील सोहळ्याची उत्सुकता लागून राहिली आहे. तत्पूर्वी राम मंदिरातील गाभाऱ्यात रामलल्लाची मूर्ती बसवण्यात आली आहे. काळ्या पाषाणातील या मूर्तीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मात्र, त्यावेळी रामाच्या मूर्तीचे डोळे झाकण्यात आले नव्हते. कारागिरांनी ही मूर्ती राममंदिरात बसवल्यानंतर आणि काही धार्मिक विधी पार पडल्यानंतर आता रामलल्लाच्या डोळ्यांवरची पट्टी दूर करण्यात आली आहे. त्यामुळे पहिल्यांदाच रामलल्लाचा चेहरा समोर आला आहे.

पाच वर्षांच्या मुलाच्या रुपातील रामलल्लाची लोभस मूर्ती पाहताक्षणीच अनेकांच्या नजरेत भरत आहे. रामलल्लाच्या चेहऱ्यावरील शांत भाव आणि हास्य मूर्तीच्या सौदर्यांत आणखीनच भर टाकत आहेत. रामलल्लाचे हे पहिलेवहिले फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. मैसूरच्या अरुण योगीराज यांनी काळ्या पाषाणातील रामल्लूलाची ही मूर्ती कोरली आहे. ही मूर्ती सात फुटी असून तिचे वजन १५० किलो इतके आहे. येत्या २२ जानेवारीला देशातील प्रमुख आचार्य आणि गुरुंच्या मंत्रघोषात रामलल्लाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाईल. प्रतिष्ठापनेसाठी दुपारी १.२८ वाजताचा मुहूर्त निश्चित करण्यात आला आहे. प्रतिष्ठापनेपूर्वीच्या विधी दोन दिवसांपूर्वी सुरु झाले. शुक्रवारी तिसऱ्या दिवशी गणेश आंबिका पुजा झाल्यानंतर पुढील विधींची सुरुवात झाली. पंडित लक्ष्मीकांत मथुरानाथ दीक्षित यांच्या देखरेखीखाली १२१ आचार्यांच्या समूहाकडून आज वेदातील मंत्रांचे पठण करण्यात आले. रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेपूर्वीच्या या विधींसाठी आचार्य कठोर धार्मिक नियमांचे पालन करत आहेत. २२ जानेवारीच्या दुपारपर्यंत आचार्यांकडून या सर्व धार्मिक नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाईल. राममंदिराच्या बाहेरच्या परिसरात वायव्य दिशेला दोन मोठ्या यज्ञशाळा उभारण्यात आल्या आहेत.